# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

माहितीचा अधिकार

## क्र. मुमाआ/नों.क्र.२१०५८७/२१/अ.क्र.५९३७/२४/०१

**श्री. इक्बाल आर खान**
ए/१५, रुम नं. १०, यशवंतराव चव्हाण नगर,
घाटकोपर-मानखुर्द लिंक रोड, मंडाळा,
मानखुर्द (प), मुंबई – ४०० ०४३.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) प.उ. पी/दक्षिण विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका उप प्रमुख अभियंता (रस्ते) पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय,
ए विंग, २ व ३ मजला, बी.एम.सी. गोडाऊन बिल्डिंग, संस्कृती कॉम्प्लेक्स,९० फिट रोड,
कांदिवली (पूर्व) मुंबई – ४००१०१.

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (रस्ते) प.उ. परि.४**
बृहन्मुंबई महानगरपालिका उप प्रमुख अभियंता (रस्ते) पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय,
ए विंग, २ व ३ मजला, बी.एम.सी. गोडाऊन बिल्डिंग, संस्कृती कॉम्प्लेक्स,९० फिट रोड,
कांदिवली (पूर्व) मुंबई – ४००१०१.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १७.१२.२०२४</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे नोटीस दि. २६.११.२०२४ रोजी प्राप्त. |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०६.०१.२०२० | ०५.०२.२०२० | ०५.०३.२०२० | ११.०९.२०२० |

अपिलकर्तांनी जन माहिती अधिकारी यांचे दि. ०५.०२.२०२० व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे दि.११.०९.२०२० रोजीचे आदेश संलग्न करुन दि. ११.०२.२०२१ रोजी आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि. ०६.०१.२०२० अन्वये "पश्चिम उपनगरेतील रस्ते डांबरीकरण कामे करण्यासाठी देण्यात आलेले कंत्राट क्र. एडब्लू-१०८" माहितीची मागणी केलेली आहे.

१. AW-१०८ रस्ता डांबरीकरण कामे करण्यासाठी कोणते कंपनीला कंत्राट देण्यात आलेली आहे त्यांची नांव, रजिस्टर नोंदनी, कामे चा रजिस्टर नोदणी, एस.सी.आर कॉपी, पे ऑर्डर कॉपी, वर्क ऑर्डर, रोड परमीट, केलेले कामाचे फोटोग्राफ्स् (कार्यापूर्व, कार्यदरम्यान, कार्यानंतरचे)

सर्व फोटोग्राफ्स् कॉपी कामाचा संपूर्ण कलर फोटो कॉपी, जागेचा नकाश, मेजर मेंट कॉपी, आर्किटेक्ट प्लान, दक्षता रिपोर्ट कॉपी, टेस्टिंग रिपोर्ट कॉपी, साईट रिपोर्ट, त्याची लेखी माहिती व कागदपत्र मिळणे.

२. कामे करण्यासाठी कोणकोणते कंपनीला आजपर्यंत किती बिले देण्यात आलेली आहे, त्याची लेखी माहिती व कागदपत्र मिळणे.

३. कंपनी तर्फे आपले विभागात कोणकोणते कागदपत्र सादर करण्यात आलेले आहे, त्याची लेखी माहिती व कागदपत्र मिळणे.

४. कामाची निरिक्षण करण्यासाठी आपल्या विभाग व दक्षता विभागाचे कोणकोणते अधिकात्यांनी जागेवर जाऊन कामाची माहिती घेतलेली त्या अधिकायांचे नांव पद, व परवानगी देणारे अधिकात्यांचे नांव पद, त्याची लेखी माहिती व कागदपत्र मिळणे.

५. कामे मधील वापरण्यात आलेली, डांबर, आर.एम.सी चलन, व इतर वापरण्यात आलेली साहित्याची जी.एस.टी चलन लेखी माहिती व कागदपत्र मिळणे.

६. राहिलेली निधीतुन कोणकोणते विकासकामे करण्याची संभावना आहे, संभावना आहे. त्याची लेखी माहिती व कादगपत्र मिळणे. (चार) माहिती टपालाद्वारे हवी आहे की व्यकतीशी : व या वर्षात किती निधी रहण्याची

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) प.उ. पी/दक्षिण विभाग यांनी अपीलार्थी यांना एक सी.डी यासोबत उपलब्ध करुन देण्यात येईल असे उत्तर दिले.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) प.उ. पी/दक्षिण विभाग यांचे उत्तराने समाधान न झाल्यामुळे प्रथम अपिल दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (रस्ते) प.उ. परि.४ यांनी दि. ११.०९.२०२० रोजी "जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत उत्तर पाठवून त्यांच्या त्यांच्या उत्तरान्वये पी/दक्षिण विभागातील रस्त्यांच्या कामासंबंधित परिरक्षित असलेल्या अभिलेखा नुसार या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती विनाशुल्क सीडी च्या स्वरुपात पुरविण्यात येत आहे असे अर्जदारास कळविले आहे. "असे आदेश पारित केले.

अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि. ११.०२.२०२१ रोजी माहिती मिळाली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

सुनावणीच्या वेळी अपीलार्थी उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपीलार्थी यांनी आयोगासमोर सादर केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) प.उ. पी/दक्षिण विभाग यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही. तसेच जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) प.उ. पी/दक्षिण विभाग यांनी दि. ०५.०२.२०२० रोजी पाठविण्यात आलेली सी.डी. स्वरुपातील माहिती प्राप्त झाली नाही. सदर माहिती नि:शुल्क मिळावी, अशी विनंती करतो.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) प.उ. पी/दक्षिण विभाग यांनी पश्चिम उपनगरेतील रस्ते डांबरीकरण कामे करण्यासाठी देण्यात आलेले कंत्राट क्र. एडब्लू-१०८ बाबतची माहिती आयोगाचे आदेश प्राप्तीच्या १५ दिवसाच्या आत अपीलार्थी यांना पुन्हा सी.डी. स्वरुपात माहिती नि:शुल्क पाठविण्यात यावी.

सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास
17-12-2024

**मुंबई** **( डॉ. प्रदीप व्यास )**
**दिनांक : १७.१२.२०२४** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission Maharashtra